# पहिल्याच दिवशी दोनशे संशोधन सादर

## अमरावती विद्यापीठात दोनदिवसीय संशोधन महोत्सव

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. १ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात सुरू असलेल्या दोनदिवसीय संशोधन महोत्सवात पहिल्याच दिवशी दोनशे संशोधकांनी आपल्या संशोधनांचे सादरीकरण केले.

शुक्रवारी (ता. ३०) दुपारी साडेअकराला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात संशोधन महोत्सव आविष्कार स्पर्धेला सुरुवात झाली. कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांनी आवश्यकता ही संशोधनाची गरज असल्याचे मत या वेळी व्यक्त करीत महोत्सवात होत असलेल्या संशोधन सादरीकरणाचे कौतुक केले.

१९६ विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या दोनशे संशोधनांत अत्यंत महत्त्वचे विषय घेतले गेले आहेत. यात मेळघाटमधील निसर्गसंजीवनी, वाणिज्यिक महत्त्व, मेळघाटात आढळणाऱ्या दुर्मिळ वनस्पतींचा उपयोग, थोरियमचा वापर करून विजेचे उत्पादन, ई-ऑटोरिक्षा, वेस्ट पासून उपयुक्त वस्तूंची निर्मिती, नॅनो पार्टिकलचा औषधांमध्ये उपयोग, स्लीप पॅरेलिसीस न होण्यासाठी उपाययोजना, बॅक्टेरिअल अँटिबायोटिक्सची गरज, कॅन्सर होऊ नये त्यावरील ड्रग्स यावर विद्यार्थ्यांनी संशोधनपूरक माहिती सादर केली. शिवाय मोबाईल यंत्राद्वारे आजारांचा प्रसार, डोळ्यांवरील कॉर्नियल अल्सरवर कॉम्बिनेशन थेरपीचा उपचार, सेंसरद्वारे पिकांसाठी पाण्याचे नियोजन, शेवग्याच्या शेंगातील बियांचा वापर करून पाण्याचे शुद्धीकरण, पारंपरिक मासेमारी पद्धत, शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी आधुनिक शेतीपद्धत, गोगलगायीपासून पिकांचा बचाव, रस्त्यावरील दिवे स्वयंचलित बंद होण्यासाठीचे नियंत्रण आदी विषयांचा समावेश आहे. स्पर्धेचे परीक्षण डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. विनोद भटकर, डॉ. वर्षा झाडे, प्राचार्य डॉ. विजय भांगडिया, डॉ. प्रणय मालवीय, डॉ. सी. एम. देशमुख, डॉ. शरद लांडे आदी प्राध्यापक करीत आहेत.

सकाळ दि. 02/11/15